आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

Elite banquet
A.C. बँक्वेट हॉल
अहिल्यानगर मध्ये पहिल्यांदा ए.सी. बँक्वेट हॉल,
भव्य हॉल व प्रशस्त पार्किंग
वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस
शुभकार्य, साखरपुडा
डोहाळे जेवण, मुंज
नामकरण समारंभ
कॉर्पोरेट इव्हेंट्स
व इ. कार्यक्रमासाठी उपलब्ध
हॉटेल संकेत
टिळक रोड, स्वस्तिक चौक, स्टेशन रोड, अहिल्यानगर
9422222020

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २४.०७.२०२५ | अंक नं. ९८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

आला रे आला राजपाल सेल आला..!
स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
खरेदी
खरेदीवर पॉईंट
पॉईंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

आज सुवर्णखरेदीचा सुवर्णयोग
गुरूपुष्यामृतयोग
0.50 ग्रॅम ते 50 ग्रॅम मधील सर्व वजनामध्ये शुध्द सोन्याची वेढणी व क्वाईन उपलब्ध.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# चोरीच्या संशयातून नागरिकांनी बेदम मारहाण केल्यावर पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या तरुणाचा संशयास्पद मृत्यू

### मृतदेह शवविच्छेदनासाठी छत्रपती संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात पाठविला

नगर – साथीदारांसह चोरी करण्याच्या उद्देशाने आल्याच्या संशयावरून काही नागरिकांनी एका तरुणाचा पाठलाग करत त्याला बेदम मारहाण केली. त्यानंतर पोलिसांनी त्यास ताब्यात घेवून पोलिस ठाण्यात आणून बसविल्यानंतर त्याचा काही वेळाने संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना पारनेर तालुक्यातील सुपा पोलिस स्टेशन हद्दीत २३ जुलै रोजी पहाटे घडली. पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशाने ही घटना 'कस्टोडिअल डेथ' म्हणून नोंदवण्यात आली असून मयत तरुणाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी छत्रपती संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

मृत तरूणाचे नाव बालाजी रतन राठोड (वय ३२, रा. पांगरी बुद्रुक, जि. जालना, मूळ रा. नागठाणा जि. परभणी) असे आहे. तो आपल्या साथीदारासह एका पिकअप वाहनातून २३ जुलै रोजी पहाटे २ वाजण्याच्या सुमारास सुपा एमआयडीसी परिसरात आला. या परिसरात कंपन्यांमध्ये वारंवार चोऱ्या होत असल्याने काही नागरिक रात्रीच्या वेळी परिसरात पहारा देत होते. राठोड याचे साथीदार पिकअप मधून उतरुन संशयास्पद रित्या अंधारात गेले. पिक अप मध्ये राठोड एकटाच बसलेला दिसल्यावर नागरिकांना त्याचा संशय आला. ते त्याच्याकडे जावू लागताच तो पिकअप घेवून पळू लागला. मात्र काही तरुणांनी त्याला सुपा टोलनाक्यावर अडविले आणि बेदम मारहाण केली.

(पुढील मजकूर पान २ वर)

### शवविच्छेदन अहवाल आल्यावर पुढील कारवाई : सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ दिवटे

याबाबत सुपा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, पहाटे २ च्या सुमारास काही नागरिकांनी संशयित चोरट्याला पकडले असल्याची माहिती मिळाल्यावर पोलिस पथकाने टोलनाका येथे जावून त्या तरुणाला ताब्यात घेतले आणि पोलिस ठाण्यात आणून बसविले. तसेच नागरिकांनी सांगितल्यानुसार त्याचे इतर काही साथीदार असल्याने त्यांना शोधण्यासाठी आमचे पथक एमआयडीसी परिसरात गस्तीसाठी गेले होते. ज्यावेळी त्या तरुणाला ताब्यात घेतले त्यावेळी त्याने आपल्याला त्रास होतोय असे काही सांगितले नाही थेट सकाळी तो आपल्या पोटात दुखत असल्याचे म्हणाला, त्यानंतर लगेच त्याला रुग्णालयात नेले. मात्र तेथे डॉक्टरांनी त्याला मयत घोषित केले आहे. त्याचा मृत्यू मारहाणीत झाला की अन्य कारणाने हे शवविच्छेदन अहवाल आल्यावरच समजणार आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाणार असल्याचे स.पो.नि. दिवटे यांनी सांगितले.

# शिर्डीच्या साईबाबा मंदिराला बॉम्बने उडवून देण्याची धमकी

### दोन ठिकाणी स्फोटके ठेवल्याचा आला ई-मेल, पोलिस प्रशासन झाले सतर्क

शिर्डी – देशातील प्रसिद्ध शिर्डीतील साईबाबा मंदिराला बॉम्बने उडवण्याची धमकी दिली गेल्याने खळबळ उडाली आहे. मंदिर ट्रस्टने या प्रकरणी शिर्डी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. ई-मेलमध्ये मंदिरातील समाधी स्थळ आणि द्वारकामाई येथे स्फोटक ठेवले असल्याचा दावा करण्यात आला आहे. माहिती मिळताच पोलिस आणि स्थानिक प्रशासन सतर्क झाले असून, मंदिर परिसरात तपासणी करत आहेत.

शिर्डीच्या साईं मंदिरात लाखो भाविक दर्शनासाठी येतात. देशाबरोबरच परदेशातूनही लोक साईबाबांचे दर्शन घेण्यासाठी येथे येतात. त्यामुळे येथे सुरक्षेची चोख व्यवस्था असते. शिर्डीत साईभक्तांची नेहमीच मोठी गर्दी असते. दर्शनासाठी शिर्डीत येणाऱ्या भाविकांना तपासणीनंतरच प्रवेश दिला जातो. दर्शन रांगेच्या प्रवेशद्वारावर साईबाबा संस्थानचे सुरक्षा कर्मचारी पुरुष आणि महिला दोघांचीही कडक तपासणी करतात. अशात मंदिराला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाल्याने पोलिस आणि प्रशासन तपास कार्यात लागले आहेत.

### धमकीचा ई-मेल 'भगवंत मान' नावाने

मिळालेल्या माहितीनुसार, भगवंत मान नावाच्या व्यक्तीने शिर्डीच्या साईबाबा मंदिराला बॉम्बने उडवण्याची धमकी दिली आहे. धमकी देणाऱ्या व्यक्तीचे नाव ईमेल आयडीवरून समोर आले आहे. धमकीचा ईमेल मिळताच शिर्डी साईबाबा मंदिर ट्रस्टने तातडीने स्थानिक शिर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. bhagvanthmannyandex.com या ईमेल आयडीवरून भागवत मान नावाच्या व्यक्तीने धमकी दिली आहे. साई मंदिर समाधी स्थळ आणि द्वारकामाईमध्ये बॉम्ब ठेवण्यात आल्याचा दावा ई-मेलमध्ये करण्यात आला आहे. सध्या या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

### प्रशासन सतर्क, तपास सुरू

सध्या शिर्डी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. धमकी कोठून आली? ती खरी की खोटी? याचा तपशीलवार शोध घेतला जात आहे. संपूर्ण मंदिर परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. साईबाबा संस्थानकडूनही श्रद्धाळूंना घाबरून न जाता सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# व्यावसायिकाला कारमध्ये उचलून नेत १.६० लाखांना लुटले

### चौघांविरुद्ध गुन्हा दाखल, एका आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

नगर – व्यावसायिकाला रस्त्यात चारचाकी गाडी आडवी लावून बळजबरीने त्या कार मध्ये बसवून निर्जनस्थळी नेवून त्याच्या फोन पे मधून १ लाख ४० हजार आणि खिशातील २० हजार रुपये काढून घेतल्याची घटना नगर एमआयडीसी परिसरातील साईबन रोड वर घडली. या प्रकरणी चौघाजणांच्या विरोधात एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून यातील एका आरोपीला पोलिसांनी २३ जुलै रोजी अटक केली आहे.

याबाबत सुरेश सखाहारी म्हसे (वय ४३, रा.डेअरी चौक, शेंडी बायपास पाण्याची टाकी, ता.नगर) पुढील मजकूर पान २ वर

समाजप्रिय
समाजाचा विकास आणि प्रगतीसाठी
आपला आजन्म वाहून घेणारे
समाजाप्रती निष्ठावंत दोन समाजप्रिय व्यक्तिमत्व..





स्व. विलासजी लोढा
(स्वर्गवास दि. २५ जुलै २०२२)
स्व. झुंबरलालजी बोथरा
(स्वर्गवास दि. १५ जुलै २०२४)
आपल्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी न भरून येणारी आहे. आपला प्रत्येक कार्यातील सहभाग आपण आमच्यातच असल्याची जाणीव करून देणारा आहे.
— आपल्या स्मृतिस विनम्र अभिवादन —
उन्नती की ओर
श्री बडीसाजन ओसवाल श्री संघ, अहिल्यानगर
संचालक मंडळ व सर्व समाज बांधव



पाण्यासाठी लागणारे
वेगवेगळ्या प्रकारचे पंप अनेक
ठिकाण मात्र एकच
अभय सेल्स
कॉर्पोरेशन अँड हार्डवेअर
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd,
Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# उद्योगांना त्रास होऊ नये, तसेच कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी तातडीने 'उपाययोजना' कराव्यात

## सुपा औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांचे प्रश्न प्राधान्याने सोडवा : जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांचे निर्देश

नगर - सुपा औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत. उद्योगांना कुठलाही त्रास होऊ नये, तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हा उद्योग मित्र समितीच्या कामाचा आढावा त्यांनी सुपा औद्योगिक वसाहतीमधील मिंडा इंडस्ट्रीज लि. येथे आयोजित बैठकीत घेतला.


सुपा येथील उद्योजकांशी चर्चा करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

या बैठकीस जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक दीपक शिवदास, व्यवस्थापक अशोक बेनके, श्याम बिराजदार, विभागीय अधिकारी गणेश राठोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गुंजाळ, तहसीलदार गायत्री सौंदाणे, एमआयडीसीचे उपअभियंता संदीप बडगे, सुपा पोलीस स्टेशनचे निरीक्षक सोमनाथ दिवटे, विद्युत विभागाचे रमेश पवार, तसेच उद्योजक अनुराग धूत, प्रकाश गांधी, जयद्रथ खकाळ, हरजीतसिंग वाधवा व औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ. आशिया म्हणाले, औद्योगिक क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी पोलीस विभागाने समन्वयातून कार्य करावे. क्षेत्रात पोलिसांची गस्त वाढवावी. यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या अध्यक्षतेखाली समितीची बैठक घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

औद्योगिक क्षेत्रात अखंडित वीजपुरवठा होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. अतिरिक्त दाबाचा वीजपुरवठा आवश्यक असलेल्या उद्योगांचे प्रस्ताव मंजूर करण्यात यावेत. औद्योगिक रस्त्यांवर पावसाचे पाणी उद्योग परिसरात जात असल्याने निचऱ्याची कामे तातडीने करावीत. पथदिवे सतत कार्यरत राहतील यासाठी दक्षता घ्यावी. अहिल्यानगर व सुपा औद्योगिक क्षेत्रातील ट्रक टर्मिनल व कामगार रुग्णालयाच्या प्रस्तावांचा पाठपुरावा करावा, असेही त्यांनी सांगितले. नेवासा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची दुरुस्ती, पुरेशा दाबाने वीजपुरवठा, मुबलक पाणी, अतिक्रमणांचे हटवणे या बाबींचे निराकरण संबंधित विभागांनी समन्वयातून करावे. उद्योगांना आवश्यक परवाने 'मैत्री पोर्टल'वरून मिळू शकतात, त्यामुळे या सुविधेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी केले.

# मंत्र्यांना पत्ते खेळण्यास वेळ मात्र शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यास वेळ नसल्याने निषेधार्थ रस्त्यावर पत्ते खेळून कायनेटिक चौकात केले 'चक्काजाम आंदोलन'

नगर - शेतकऱ्यांचे कर्ज माफ करून सातबारा कोरा करावा तसेच दिव्यांगांचे मानधन वाढवून शेतकरी कर्जमाफी करावी हमीभाव व मग्ररोहयो अंतर्गत मंजुरी पेरणी ते कापणी, मेंढपाळ, मच्छीमार, ग्रामपंचायत कर्मचारी यांना वेतन व सुविधा दिव्यांग बांधवांना सहा हजार मासिक मानधन या मागणीसाठी प्रहार जनशक्ती व प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने नगर-पुणे कायनेटिक चौक येथे चक्काजाम आंदोलन केले. मंत्र्यांना पत्ते खेळण्यास वेळ आहे मात्र शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यास वेळ नसल्याने रस्त्यावर पत्त्याचा डाव खेळून जमिनीवर आसूड मारण्यात आले.

यावेळी जिल्हाध्यक्ष विनोद सिंग परदेशी, प्रहार दिव्यांगचे जिल्हा अध्यक्ष अँड. लक्ष्मण पोकळे, शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष बच्चुभाऊ मोडवे, अविनाश ठाणगे, पप्पू येवले, नाना पारदे, रामदास जगधने, प्रवीण पिंपळे, गोरक्षनाथ पालवे, संजय पुंड, किशोर सूर्यवंशी, वसीम शेख, हमीद शेख, संदीप शेडकर, काता सरडे, पोपट शेळके, मनीषा जगताप, गीतांजली कासार, नंदा शिंदे, मालोजी शिकारे, किशोर शिकारे, विष्णू आढाव, गोवर्धन गरजे, भाऊसाहेब शिरसाठ, सिताराम गरजे, आसाराम गर्जे, दिनकर बडे, शिवाजी खेडकर, रमेश खाडे, बाबासाहेब वांडेकर, जालिंदर गोलघर, सोमीनाथ गोलघर, विष्णू कुरे, आणिनात शिरसाठ, सुरेश आंधळे, लियाकत खान, मारुती ताकपेरे, सचिन गोटे, सुरेश सुपेकर, वामन भद्रे, संजय घोडके, बुवाजी रसाळ, सावता हिरवे, धनराज भोपळे, साहेबराव रासकर, भगवान बोबडे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.



प्रहार जनशक्ती व प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने नगर-पुणे कायनेटिक चौक येथे चक्काजाम आंदोलन करण्यात आले.

प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली अनेक आंदोलने झाले यात रायगड तीन दिवसीय अन्नत्याग आंदोलन, सर्व आमदारांच्या घरासमोर ठिया आंदोलन, मशाल मोर्चा, मंत्री यांच्या घरासमोर रक्तदान आंदोलन, तुकडोजी महाराज यांच्या कर्मभूमीत आठ दिवशी उपोषण, पापडते चिखलगव्हाण शेतकरी आत्महत्या गावातून सातबारा कोरा पदयात्रा पूर्ण केल्यानंतर शेवटी सरकारने दखल घेऊन राज्याचे सचिव प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नेमण्याची आश्वासन दिले. त्याचप्रमाणे दिव्यांगांचे मानधन हजार रुपये वाढ केली असे असताना महाराष्ट्रातील सामान्य जनतेला या सरकारवर विश्वास नसल्याकारणाने बच्चू कडू यांनी महाराष्ट्रभर चक्काजाम आंदोलन बंड पुकारले असून देशातून सर्वात जास्त महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहे. नुकतेच पाथर्डी तालुक्यात घायतडक वाडीतील बाबासाहेब नामदेव घायतडक (वय ४६) या शेतकऱ्याने सावकाराला कंटाळून आत्महत्या केली आहे. अशा महाराष्ट्रात प्रत्येक घटना घडल्या आहे. तरी शासनाने धोरण बदलताना दिसत नाही त्या कारणाने प्रहार जनशक्ती संघटनेच्या जिल्हा अध्यक्ष विनोदसिंग परदेशी व दिव्यांग क्रांतीचे जिल्हा अध्यक्ष अँड. लक्ष्मण पोकळे यांच्या नेतृत्वाखाली नगर-पुणे कायनेटिक चौक या ठिकाणी चक्काजाम गाय, बैल, म्हशी आणण्यात आले. यामध्ये शेतकरी, शेतमजूर, कामगार, दिव्यांग, विध्वमाता, मेंढपाळ, यांच्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी पक्ष जात धर्म सोडून या आंदोलनात शेतकरी अपंग माजी सैनिक सहभागी झाले होते.

# व्यावसायिकाला कारमध्ये उचलून नेत १.६० लाखांना लुटले

(पुढील मजकूर पान २ वर)

यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा शिलाई मशीनचा व्यवसाय असून ते ६ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता साईबन रोडने जात असताना त्यांना स्वप्नील व्यंकटेश मेहेत्रे, हर्षद गौतम गायकवाड, विश्वजीत वसंत माने (तिघे रा. वडगावगुप्ता, अ.नगर) व वैभव गौतम गायकवाड यांनी रोडवर चारचाकी गाडी आडवी लावुन, आडवुन त्यांना बळजबरीने गाडीत बसवुन पुढे निर्जन स्थळी नेले. त्यानंतर फिर्यादीच्या ओप्पो कंपनीचे मोबाईल मधुन फोन पे वरुन १ लाख ४० हजार रुपये फिर्यादीकडुन बळजबरीने स्वप्नील मेहेत्रे याचे फोन पे अकाउंटवर ट्रान्सफर करुन घेतले. तसेच फिर्यादीच्या खिशातील २० हजार रुपये काढून घेऊन तू जर या प्रकाराबाबत कोणाला काही सांगितले तर तुला व तुझ्या कुटुंबाला जिवे ठार मारुन टाकू असा दम दिला. तसेच तिघांनी मिळून फिर्यादीस लाथाबुक्क्याने मारहाण करुन गाडीचे खाली ढकलुन दिले. या मारहाणीत फिर्यादी हे जखमी झाले.

या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात सुरेश म्हसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन स्वनिल मेहेत्रे, हर्षद गायकवाड, विश्वजीत माने व वैभव गायकवाड यांच्याविरुद्ध बी एन एस ११८ (२) ११९ (१) १२६ (२), ११५ (२). ३५२. ३५१ (२) प्रमाणे तिघांविरुद्ध गुन्हा केला. गुन्हा दाखल झाल्यावर पोलिसांनी स्वनिल मेहेत्रे यास अटक केली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार टेमकर हे करीत आहेत.

# पोलिस मुख्यालयात घरफोडी करणाऱ्या दोघांना पकडले

## बालिकाश्रम रोडवरील चोरीही उघड, ८ लाख ७६ हजार रुपयांचे दागिने हस्तगत

नगर - पोलिस मुख्यालयात महिला पोलिस कर्मचाऱ्याच्या घरी चोरी करणाऱ्या दोघांना तोफखाना पोलिसांनी पकडले असून त्यांनी बालिकाश्रम रोडवरही काही दिवसांपूर्वी चोरी केल्याचे तपासात समोर आले आहे. प्रकाश उर्फ मारी रावसाहेब उमाप (वय २४, रा. सिध्दार्थनगर) व दुर्गेश चंद्रकांत चितांमणी (वय २१, रा. अमरधामच्या पाठीमागे, नेप्ती नाका) अशी आरोपींची नावे आहेत. या दोघांकडून पोलिसांनी ८ लाख ७६ हजारांचे दागिने हस्तगत केले आहेत.


पोलिस मुख्यालयात चोरी करणाऱ्या दोघांना पकडून त्यांच्याकडून हस्तगत केलेल्या मुद्देमालासह तोफखाना पोलिसांचे पथक.

महिला पोलिस कर्मचारी सुनंदा नरहरी ढाकणे (वय ४५, रा. पोलीस मुख्यालय, अहिल्यानगर) यांनी १८ जुलै रोजी फिर्याद दाखल केली होती की, १७ जुलै रोजी संध्याकाळी ६.१५ ते ८.४५ दरम्यान त्यांच्या घराच्या मागील दरवाजाची कडी कोणीतरी उघडून घरात प्रवेश केला आणि लोखंडी कपाटातील ६८ हजार रूपये किमतीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेण्यात आली. यावरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला. या दरम्यान त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार सदर चोरी प्रकाश उर्फ मारी रावसाहेब उमाप याने केली असल्याचे समोर आले. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

पुढील तपासात त्याने काही दिवसांपूर्वी बालिकाश्रम रस्त्यावरही चोरी केल्याचे सांगत चोरीचे दागिने आपला मित्र दुर्गेश चंद्रकांत चितांमणी याच्याकडे ठेवले असल्याचे सांगितले. पोलिसांनी दुर्गेशला पकडून त्याच्याकडून ७० ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या बांगड्या, ६ ग्रॅम वजनाचे दोन कानातील टॉप्स, ४ ग्रॅम वजनाच्या चार लहान अंगठ्या, ४.५ ग्रॅम वजनाचे दोन झुबे, ३.५ ग्रॅम वजनाचे मिनी गंठण, ३.५ ग्रॅम वजनाचे डोरले व चांदीची चैन असा एकूण ८ लाख ७६ हजार रूपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर, अंमलदार योगेश चव्हाण, अविनाश बर्डे, सतिष त्रिभुवन, सतिष भवर, भागवत बांगर, मोबाईल सेलचे राहुल गुंड्डू यांच्या पथकाने केली आहे.

# नगर अर्बन बँकेच्या घोटाळ्यात कर्जदार मनोज मोतियानीला ५ दिवस पोलिस कोठडी

नगर - नगर अर्बन बँकेच्या कर्ज घोटाळा प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने कर्जदार मनोज वासुमल मोतीयानी (रा. सावेडी गाव, अ.नगर) याला अटक केली आहे. त्याला २३ जुलै रोजी न्यायालयात हजार केले असता न्यायालयाने ५ दिवस पोलिस कोठडी सुनावली आहे.

बँकेचा तत्कालीन सहाय्यक मुख्य व्यवस्थापक मनोज फिरोदिया याने कुवत नसतानाही तारण मालमत्तांचे वाढीव दराचे मूल्यांकन अहवाल घेऊन कमाल मर्यादेचे कर्ज मंजूर करण्याची शिफारस केली. तसेच, प्रवीण लहारे याने ३ कोटींचे कर्ज घेऊन ती रक्कम संशयित आरोपी मनोज वासुमल मोतीयानी याच्या खात्यात वर्ग केल्याचे व त्यातून जागा खरेदी झाल्याचा आरोप आहे. या गुन्ह्यात मोतीयानी याचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने नामंजूर केल्याने तो न्यायालयासमोर हजर झाला होता. न्यायालयाने त्याला येथील कारागृहात ठेवण्याचे आदेश दिले होते. तसेच गुन्ह्यात अटक करण्यासंदर्भात आर्थिक गुन्हे शाखेला कळविले होते. आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्याला ताब्यात घेत अटक केली. न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन...

## आचार्यश्री आनंदऋषीजी म.सा.शतकोत्तर रजत जन्मजयंतीचा पूर्णाहुती सोहळा



श्रावणाचा शुभारंभ हा शुभदिन म्हणजे राष्ट्रसंत आचार्य सम्राट पू. श्री. आनंदऋषीजी म.सा. यांचा जन्मदिन. यंदा त्यांच्या जयंती महोत्सवास १२५ वर्षे पूर्ण होत आहे. यानिमित्त केवळ जैनच नाही तर विविध जाती धर्माचे भाविक भक्त आणि केवळ आपल्या नगर मध्येच नव्हे तर भारतभर सर्वदूर त्यांच्या आनंददायी स्मृतीत जप, तप, साधना, दान, उपवास, आराधना अशा विविध पुष्पांजलीने त्यांना श्रद्धासुमन वाहिले जाईल.

खरं तर आज आषाढी अमावस्या! नव्या पिढीला दिप अमावस्येचे महत्त्व नव्याने सांगावे. दिपपूजनाने पुढील सर्व सणासुदींना भक्तीभावाने सर्वांनी पुढे जावे.

आज आचार्यश्री गुरुदेवांच्या निमित्ताने काही गोष्टी सांगाव्याशा वाटतात. आचार्यश्रींची नगर म्हणजे कर्मभूमी. त्यांच्या पदस्पर्शासह शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी नगरच्या व एकूणच धार्मिक, अध्यात्मिक, शैक्षणिक, आरोग्य व इतर क्षेत्रात मोठ-मोठी कार्ये केलीत. त्या कार्याच्या स्मृतीगंधाने आनंदधाम परिसर आजही दरवळतोय.

जैन धर्मीय मुख्यत: अहिंसा, परमोधर्म तत्त्वाने संयम, तप आराधनेत जीवन व्यतीत करतात. व्यवसाय निपुण असले तरी सर्वोत्तम दान, सामाजिक भान ठेवून ते इतरांनाही सहकार्य करतात. आता आपल्या नगरचेच पहा ना. आनंदधाम-धार्मिक परीक्षा बोर्ड, आनंदऋषीजी हॉस्पिटल, ब्लड बँक, नर्सिंग कॉलेज, नियोजित आंतरराष्ट्रीय महावीर विद्यापीठ यासारखी मोठी कार्ये आपण पाहू शकता.

आचार्यश्रींच्या आशीर्वाद व प्रेरणेने उपवास भव्यदिव्य प्रमाणात देशभर होत आहेत. पुण्यात तर यावर्षी प्रखर उपवासांची बरसात चालू आहे. धार्मिक वातावरण चरण सिमेवर आहे. सोपे नाही ८-१० दिवस विना अन्न राहणे. यातून शरीरासह आत्म्याची शुद्धी होते. सर्व तपस्या करणाऱ्यांना विनम्र जय जिनेन्द्र व अनुमोदना.

जैन बंधुभगिनींनी उचित अभिमान व आनंद मानावा की गुरुदेवांमुळे शहराच्या इतिहासात आपले नाव कायम असेल. गुरुदेवांच्या चरणी अनंद वंदन.

- **किशोर गांधी** (मो.बा.९८२२०२०६९१)

## डॉ. अरुण महाजनी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील ज्येष्ठ भूलतज्ञ डॉ. अरुण महाजनी (वय ८३) यांचे २३ जुलै रोजी पुणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन सुना व नात असा परिवार आहे.

## शकील शेख यांचे हृदयविकाराने निधन



नगर - रभाजीनगर, शिवाजीनगर केडगाव येथील शकील बापू शेख (वय ५०) यांचे २३ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. केडगाव येथील कब्रस्तानमध्ये त्यांचा दफनविधी करण्यात आला. त्यांच्या मागे पत्नी, २ बहिणी, १ भाऊ, १ मुलगा, ४ मुली असा परिवार आहे. अशफाक शेख यांचे ते वडील होत.

## श्रीमती आशादेवी पाटील (कदम) यांचे निधन



नगर - मराठानगर, नेप्ती रोड, केडगाव येथील रहिवासी श्रीमती आशादेवी प्रकाश पाटील (कदम) (वय ६८) यांचे २१ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कुलदीप प्रकाश पाटील (कदम), सत्यजीत प्रकाश पाटील (कदम) यांच्या त्या मातोश्री होत. समर्थ क्रिएशनचे सत्यजित पाटील यांच्या त्या मातोश्री होत.

## प्रतिभाताई कार्ले यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार - येथील केशवनगर परिसरातील रहिवासी प्रतिभाताई श्रीकांत कार्ले (वय ३८) यांचे २३ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, चुलते, मामा, मामी, आजी असा परिवार आहे. संभाजी ब्रिगेडचे महानगर अध्यक्ष व जिल्हा मराठा पतसंस्थेचे संचालक अच्युत गाडे यांच्या त्या धाकट्या भगिनी होत. त्या नगर जिल्हा कोर्ट येथे सिनीयर क्लार्कपदी कार्यरत होत्या.

## सुरेश परदेशी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - विवेकानंद कॉलनी, सावेडी नाका येथील रहिवासी व महावितरणचे सेवानिवृत्त कर्मचारी सुरेश सिताराम परदेशी (वय ८१) यांचे २२ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. सिस्टॉपीक फार्माचे रिजनल सेल्स मॅनेजर व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे माजी अध्यक्ष राजेश परदेशी यांचे ते वडील होते.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या तरुणाचा संशयास्पद मृत्यू

(पान १ वरुन)

ही घटना परिसरातील सीसीटीव्हीत कैद झाली आहे. घटनेची माहिती मिळताच सुपा पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी राठोडला ताब्यात घेतले आणि पोलीस ठाण्यात आणून बसवण्यात आले. काही वेळातच त्याच्या तब्येतीत बिघाड होऊ लागला. अखेर त्याला उपचारासाठी रूग्णालयात हलवण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासल्यानंतर त्याला मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळाल्यावर पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी ही बाब गांभीर्याने घेवून घटनेचा सखोल तपास करण्याचे आदेश दिले.

या प्रकरणात प्राथमिक तपासात पोलिसांचा गंभीर हलगर्जीपणा स्पष्ट होत आहे. संशयिताला ताब्यात घेतल्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करणे अनिवार्य असते. मात्र, पोलिसांनी हे नियम पाळले नाहीत. यामुळे पोलीस ठाण्यातच झालेल्या मृत्यूची जबाबदारी आता पोलिसांवर येते आहे. त्यामुळे संबंधित तरूणाच्या मृत्यू प्रकरणी सुपा पोलिस ठाण्यात 'कस्टोडिअल डेथ' म्हणून आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृतदेहाचे शवविच्छेदन छत्रपती संभाजीनगर येथील घाटी या शासकीय रूग्णालयात करण्याचा निर्णय घेण्यात आला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे.

## इंदूबाई डाडर यांचे हृदयविकाराने निधन



नगर - ओंकारनगर केडगाव देवी जवळील इंदूबाई तुकाराम डाडर (वय ७२) यांचे २२ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, सुना, ४ नातवंडे असा परिवार आहे. राजेश, सतीश, मनोज डाडर यांच्या त्या मातोश्री होत.

## बदामबाई गांधी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - येथील धार्मिक परीक्षा बोर्ड जवळील शिंदे हॉस्पिटल शेजारील रहिवासी श्रीमती बदामबाई सिमरतमल गांधी (रस्सीवाले, वय ९०) यांचे २४ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रकाश गांधी (रस्सीवाले) नगर केमिस्ट संघटना, जायंटस् ग्रुपचे अध्यक्ष व शुभम मेडीकलचे अनिल गांधी, सौ. शोभा बोरा तसेच सौ. ज्योत्स्ना चोपडा यांच्या त्या मातोश्री होत. पंकज व शुभम गांधी यांच्या त्या आजी होत. त्यांच्यामागे २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# इन्फर्टिलिटी... वंध्यत्वावर बोलू काही....

प्रत्येक विवाहित दाम्पत्याच्या जीवनात अपत्य सुखाला महत्व असते. घरात पाळणा हलला म्हणजे संसार मार्गी लागला असेच मानले जाते. पंधरा ते वीस वर्षांपूर्वी प्रेग्नेंसी राहण्यासाठी एवढ्या अडचणी येत नव्हत्या. परंतु आपण आता पाहतो लग्न झाल्यानंतर बऱ्याच दाम्पत्यांना प्रेग्नेंसी राहण्यासाठी अडचणी येतात. एवढं तंत्रज्ञान पुढे गेलंय, नवनवीन औषधांचा शोध लागला आहे, त्यात आयव्हीएफ सारखं एक वरदान मिळालं. तरी सुद्धा प्रेग्नेंसी न राहणे हे प्रमाण खूप वाढत चाललंय. एक स्त्रीरोग तज्ज्ञ म्हणून जाणवतं की, येणाऱ्या दिवसांमध्ये हे प्रमाण अजून जास्त वाढणार आहे. सुरुवातीला प्रेग्नेंसी राहत नाही म्हणून स्त्रियांमध्ये अडचणी जास्त प्रमाणात दिसायच्या. परंतु गेल्या चार-पाच वर्षांमध्ये प्रमाण हे खूप जास्त प्रमाणात वाढलं आहे.

प्रेग्नेंसी राहण्यासाठीच योग्य वय हे १८ ते २५ वर्षे हेच आहे. आजकाल आपण पाहतो लग्नच हे ३० वर्षानंतर होतं. लग्नानंतर त्या कपलला आपलं आयुष्य जगायचं असतं, करियर करायचं असतं, फिरायचं असत...सगळं झाल्यानंतर मग त्यांना एकटेपणा जाणवू लागतो आणि मग कुठेतरी वाटतं की आता बाळ असावं. यामध्ये तीन ते चार वर्षे जातात. प्रेग्नेंसी ठेवण्यापर्यंत वय ३४-३५ वषापर्यंत आलेले असतं. जसं स्त्रीचं वय वाढतं तसं तिच्या शरीरामध्ये असलेल्या स्त्रीबीज, (follicles) संख्या कमी होते. त्याची क्वालिटी आणि क्वांटिटी हे दोन्ही कमी होत जातं आणि प्रेग्नेंसी राहण्यासाठी अडचणी येतात.

पुरुषांच्या बाबतीमध्ये सुद्धा फायनान्शिअल स्ट्रेस, पर्सनल स्ट्रेस, जॉब स्ट्रेस अशा सगळ्या गोष्टींचा स्वतःच्या शरीरावर परिणाम होत असतो. आणि यातूनच विर्याची जी गुणवत्ता आहे ती कमी कमी होत जाते. अलीकडे आपण पाहिलं, बीपी, शुगर या आजारांचे प्रमाण सुद्धा खूप वाढले आहे. सतत बाहेरचं खाणं, व्यायाम न करणं, स्ट्रेस या सगळ्या गोष्टींचा परिणाम आपल्या शरीरावर होत असतो आणि यातूनच प्रेग्नेंसी राहण्यासाठी अडचण येतात. जर आपण आपल्या देशाचा विचार केला तर आपल्या जुन्या लोकांच्या काही गोष्टी खूपच चांगल्या आहेत. जर आपल्याला या इन्फर्टिलिटीवर मात करायची असेल तर त्या फॉलो करणं गरजेचं आहे.

योग्य वयामध्ये लग्न करणे, योग्य वयात प्रेग्नेंसी ठेवणे, हेल्दी लाइफस्टाईल मेंटेन करणे, बॅलन्स लाईफ जगणं खूप गरजेचे आहे. इनफर्टिलिटीची ट्रीटमेंट घेत असताना सगळ्यांना फास्ट रिझल्ट हवे आहेत आणि यामुळेच थोड्या दिवसात प्रेग्नेंसी राहिली नाही की मग IUI करणं आणि iUI ने प्रेग्नेंसी नाही राहिली तर IVF (टेस्ट ट्यूब बेबी) करणे हे आता सर्रास सुरू झाल आहे. IVF हे आपल्याला भेटलेलं एक वरदानच आहे पण ते कोणत्या पेशंटमध्ये आणि कधी करणं हे महत्त्वाचं आहे.

आजकाल तर खूप पेशंट येतात. डॉक्टर माझ्याकडे वेळ नाही डायरेक्ट IVF करा. ज्या कपलला प्रेग्नेंसी राहत नाही त्या कपलने डॉक्टरांकडे जाऊन सगळ्या तपासण्या करणे गरजेचे आहे आणि जर तपासण्या नॉर्मल असेल तर कमीत कमी एक वर्ष नॅचरल प्रेग्नेंसी साठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. लग्न झाल्यानंतर लगेच महिन्या दोन महिन्यात सगळ्या कपलला प्रेग्नेंसी राहत नाही. साधारणत: विचार केला तर एक वर्षाचा कालावधी लागतो. पण नॅचरल प्रेग्नेंसी साठी कमीत कमी एक वर्ष प्रयत्न करणं गरजेचं असतं. बऱ्याच पेशंटला प्रेग्नेंसी राहील राहिली नाही की आम्ही लॅप्रोस्कोपीचे ऑपरेशन सांगतो आणि पेशंटला भीती वाटते की नको आणि ते वेळ घालवत जातात. परंतु आमच्या सर्व गायनॅकॉलॉजिस्टच्या अनुभवानुसार एक गोष्ट लक्षात आली आहे की, लॅप्रोस्कोपी नंतर बऱ्याच वेळेस नॅचरल प्रेग्नेंसी राहण्याचे प्रमाण हे जास्त वाढलेलं असतं.

त्यामध्ये गर्भपिशवी नॉर्मल आहे का, गर्भपिशवीचा अस्तर नॉर्मल आहे का? दोन्ही गर्भ नलिका पूर्णपणे ओपन आहेत का, overy यांची साईज कशी आहे, त्यावर पाण्याच्या गाठी आहे का, जर असेल तर त्या ruptured करता येतात आणि त्यानंतर चांगल्या क्वालिटीचे फॉलिकल्स तयार होतात. त्यामुळे ज्या कपल्सला प्रेग्नेंसी राहत नसेल त्यांनी लेप्रोस्कोपीचे ऑपरेशन करून नॅचरल ट्राय करणे हे सुद्धा खूप गरजेचे आहे.



– **डॉ.अमोल जाधव,** स्त्रीरोग तज्ज्ञ, सरस्वती हॉस्पिटल

# 'लहानपणीचा लठ्ठपणा' हा जागतिक महामारीचा चेहरा

## लठ्ठपणा वाढता आरोग्यराक्षस

नगर – लठ्ठपणा ही आता भविष्यातील नव्हे तर सध्याचीच धोकादायक समस्या बनली आहे. पूर्वी फक्त श्रीमंत समाजांची ही चिंता मानली जात होती, पण आता लहानपणीचा लठ्ठपणा हा एक जागतिक महामारीचा चेहरा घेत आहे, जो सर्व सामाजिक स्तरांतील कोट्यवधी मुलांना प्रभावित करत आहे. या संकटाशी लढण्यासाठी व समाजात जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने भारतीय बालरोग तज्ञ संघटनेच्या वतीने वर्ल्ड ओबेसिटी ॲटलस ही देशव्यापी जनजागृती मोहिम सुरु करण्यात आली असल्याची माहिती भारतीय बालरोग तज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. वसंत खळदकर यांनी दिली.



वर्ल्ड ओबेसिटी ॲटलस २०२३ नुसार, जर सध्याचे प्रमाण असेच चालू राहिले तर २०३५ पर्यंत जगातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या लठ्ठ किंवा जास्त वजनाची असू शकते. यातील ९०% पेक्षा अधिक प्रकरणे जीवनशैलीशी संबंधित असून, चुकीचे आहार पद्धती, शारीरिक हालचालींचा अभाव आणि वाढता स्क्रीन टाइम हे याचे मुख्य कारण आहेत. लठ्ठपणा हा केवळ वजनाचा प्रश्न नाही, तो भविष्यातील आरोग्य संकटाचा इशारा आहे. कृती करण्याची वेळ आता आली आहे,

भारतीय बालरोग तज्ञ संघटनेच्या वतीने बालमुलांमधील लठ्ठपणा रोखण्यासाठी लठ्ठपणा वाढीचे निरीक्षण, बीएमआय मोजणी आणि कंबर मोजमाप, तसेच दिशा २-यू टर्न या नावाने तयार केलेली शॉर्ट फिल्म, जी यू ट्युबवर उपलब्ध आहे. याच्या माध्यमातून पालक आणि लहान मुलांमध्ये जागृकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

लठ्ठपणा रोखण्यासाठी एबीसीडी सूत्र स्विकारण्यात आली आहे. (ए) आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारा, (बी) वाढीच्या चार्ट्सचा वापर करा, (सी) शाळा आणि समाजात जनजागृती निर्माण करा आणि (डी) आहारविषयक गैरसमज दूर करा याचा समावेश आहे. प्रतिबंध ही सामूहिक जबाबदारी आहे. पालक, शाळा, डॉक्टर आणि धोरणकर्ते यांच्यात समन्वय आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

बालकांमध्ये लठ्ठपणामुळे निर्माण होणारे मानसिक परिणाम जसे की स्वतःविषयी हीन भावना, एकटेपणा, किंवा सामाजिक कटाक्ष ही लक्षणे दुर्लक्षित करू नयेत. ज्या मुलांमध्ये गुंतागुंतीची लक्षणे दिसून येतात त्यांना तातडीने तज्ज्ञांकडे पाठवणे महत्त्वाचे आहे. लठ्ठपणाकडे खरी धोकादायक समस्या समजून, तत्परता, सहानुभूती आणि शिक्षणाने त्याला सामोरे जाण्याची गरज असल्याचे डॉ. वसंत खळदकर यांनी म्हटले आहे.

प्रत्येक कुटुंबातील पालकांना मुलांसाठी संतुलित आहार, विशेषतः नाश्ता नियमित द्या, दररोज किमान ४५ मिनिटे शारीरिक व्यायाम प्रोत्साहित करा, स्क्रीन टाइम १ तासापेक्षा कमी ठेवा आणि अत्यंत डाएटिंग आणि अतिस्नॅकिंग टाळण्याचे आवाहन भारतीय बालरोग तज्ञ संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.



डॉ. वसंत खळदकर

# पतसंस्थेला दिलेला धनादेश न वटल्याने उद्योजकाला ५ लाख रुपये दंड व शिक्षा

नगर – सहकार महर्षी श्री सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, अहमदनगर यांनी आरोपी पवन अभय खाबीया, आनंदनगर सोसायटी, गुलमोहोर रोड, सावेडी, अहमदनगर यांना चारचाकी वाहन खरेदीकरीता घेतलेल्या कर्जाच्या थकबाकी पोटी आरोपी पवन अभय खाबीया यांनी दिलेला रक्कम रु.३,००,००० चा धनादेश अनादरीत झाल्याने आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली होती. सदर खटल्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय होऊन ८ वे अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी प्रतिभा ए पाटील अहमदनगर यांनी आरोपी पवन खाबीया यास निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट १८८१ चे कलम १३८ अन्वये दोषी धरुन १ वर्ष करावास तथा रक्कम रु.५,००,००० नुकसान भरपाई फिर्यादीस देणेबाबत तसेच नुकसान भरपाई रकमेचा भरणा न केलेस आणखी ६ महिने कारावासाची शिक्षा ठोठावली. पैकी रक्कम रु.४,९५,००० फिर्यादी यांना नुकसान भरपाई म्हणुन देण्याचा आदेश केलेला आहे.

प्रस्तुतचे खटल्यामध्ये फिर्यादीतर्फे ॲड. मनिष पी. गांधी यांनी कामकाज पाहिले.

# इन्स्टाग्रामच्या जमान्यात लेखन कौशल्य जोपासणे काळाची गरज

## संचालक राहुल बांगर यांचे प्रतिपादन

नगर – कोविड काळानंतर विधयार्थ्यांच्या वर्तनात अमुलाग्र बदल झाला असून एमोजिस, इन्स्टाग्राम सारख्या ॲपच्या वापरामुळे लिखाण कौशल्यात अधोगती होत आहे, शब्दांऐवजी चिन्ह आणि हातवारे (जे आधीमानव वापरात होते) यांचा वापर खूप वाढत आहे. त्यामुळे प्रत्यक्ष वही पेन हातात घेऊन स्वताचे विचार स्पष्टपणे व्यक्त होता येणे विद्यार्थ्यांच्या मानसिक सुदृढ्तेसाठी आवश्यक आहे, असे प्रतिपादन महास्कील संस्थेचे संचालक राहुल बांगर यांनी या प्रसंगी केले.

महास्कील टेक इनोव्हेटिव फौंडेशनतर्फे श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय येथे इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



महास्कील टेक इनोव्हेटिव फौंडेशन तर्फे श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय येथे इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

## महास्कील टेक इनोव्हेटिव फौंडेशनतर्फे मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप

तसेच शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना केवळ चांगली शाळा, शिक्षक मिळणे महत्वाचे नाही तर त्याच बरोबर शैक्षणिक साहित्य सुद्धा मिळणे आवश्यक आहे. दुर्दैवाने पालकांच्या आर्थिक दुर्बलतेमुळे शैक्षणिक साहित्य वेळेवर उपलब्ध होत नाही. सर्व दाना मध्ये विद्या दान हेच सर्व श्रेष्ठ दान असते याची जाणीव ठेवून एक सामाजिक बांधिलकी म्हणून दरवर्षी हा उपक्रम महास्कील संस्थेमार्फत घेण्यात येतो.

समाजातील विषमता दूर करण्यासाठी दानशक्ती महत्वाची असून धनशक्ती पेक्षा दानशक्ती समाजामध्ये अमुलाग्र बदल घडवेल असा आशावाद आभार प्रसंगी मुख्याध्यापिका सौ.विद्या दगडे यांनी व्यक्त केला. तसेच विद्यार्थ्यांची गरज आणि लेखन कौशल्याचा होत असलेला ऱ्हास या बाबी विचारत घेऊन महास्कील संस्थेने सुरु केलेल्या या अभिनव कार्याबद्दल परिसरातील पालक आणि शिक्षक वर्गाने समाधान व्यक्त केले.

महास्कील संस्थेच्या वतीने प्रोगाम मेनेजर अभिजित चिंतामणी, गाडेकर दादा, राहुल बांगर, गोरे एस.के., तसेच शालेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. अन्य शाळेत देखील असा उपक्रम होणार असून, या ज्ञान साहित्य वाटप मोहिमेत जोडण्यासाठी संस्थेच्या ९०१११९३७०० या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री संत नामदेव महाराज पुण्यतिथी सोहळा उत्साहात साजरा

## काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरण

नगर – नामदेव शिंपी समाज ट्रस्टच्यावतीने सावेडी येथील शिंदे मळ्यातील श्री संत नामदेव महाराज मंदिरात संतश्रेष्ठ श्री संत नामदेव महाराज यांची पुण्यतिथी अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, मिरवणूक आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

पुण्यतिथी सोहळ्याची सुरुवात भव्य दिंडी मिरवणुकीने झाली. या मिरवणुकीत समाजबांधव सहभागी झाले होते. लहानग्यांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांचा सहभाग होता. महिलांचा सहभाग विशेष लक्षणीय होता. अनेक महिलांनी पारंपरिक वेशभूषेत, टाळ-मृदंगांच्या गजरात सहभागी होऊन मिरवणुकीला शोभा दिली. रस्त्याच्या कडेला महिला आणि बालकांनी आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या. काही ठिकाणी फुलांची उधळण करत, टाळ्यांच्या गजरात व भजन-गजर करत मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण परिसर एकदम भक्तिभावाने भारलेला होता.



श्री संत नामदेव महाराज पुण्यतिथी सोहळा उत्साहात साजरा झाला. (छाया – लहू दळवी)

सावेडी येथील शिंदे मळ्यात सकाळी १० ते १२ या वेळेत पिंपळेश्वर संस्थानचे ह.भ.प. राऊत महाराज यांचे काल्याचे कीर्तन पार पडले. आपल्या रसाळ वाणीने आणि ओघवत्या शैलीत त्यांनी संत नामदेव महाराजांचे जीवनचरित्र, त्यांच्या भक्तीची गाथा, विठ्ठलभक्तीचा प्रभाव आणि त्यांनी समाजात दिलेला संदेश याचे प्रभावी वर्णन केले. नामस्मरण म्हणजे केवळ शब्द नव्हे, तो एक कृतीशील जीवनमार्ग आहे. संत नामदेवांच्या जीवनातून आपण समतेचा, सेवा भावनेचा आणि निर्भीड भक्तीचा मार्ग शिकू शकतो. नामस्मरणातूनच खरे समाज परिवर्तन घडते, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले होते.

यावेळी नामदेव शिंपी समाज ट्रस्टचे अध्यक्ष सौ. प्रमिला दुमाटे, ट्रस्टचे उपाध्यक्ष दिलीप काकडे, खजिनदार कृष्णा भस्मे, सचिव राजेंद्र बगाडे, सहसचिव गोविंद बारटक्के, सदस्य सुरेश लोळगे, सुधीर नेवासकर, महेश चौकटे, श्रीमती अनिता वादवने, श्रीकांत बुलबुले, जुगलकिशोर वायचळ, शंतनू वनारसे, गौरव वनारसे, चंद्रकांत काकडे, शिवाजी बोंडगे, सौ. निर्मला लोळगे, सौ. हेमलता वडे, शिरीष लिमकर, राजू लिमकर, सचिन काकडे, राजू पाटकुले, प्रमोद गोंदकर, निलेश बुरसे, अशोकराव होमकर, सौ. छायाताई लिमकर, संतोष आंबेकर, अशोक सातपुते, सौदागर सदावर्ते, राजेंद्र उल्हारे, सौ. संगीता बाचल, दिलीप पतंगे, सौ. विमल पाटकुले, अक्षय लोळगे, निलेश चौकटे, सौ. वंदना काकडे, सौ. क्रांती काकडे, सौ. लक्ष्मी पाटकुले, दिनेश चौकटे, राजू बुलबुले, बळीराम सातपुते, सौ. स्वाती अवसरकर, रमेश खोले, रोहिदास वडे, अभिषेक पाटकुले, स्वप्निल चौकटे, चंद्रकांत कल्याणकर उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून आयुर्वेद संस्थांचे अध्यक्ष सचिन जगताप, अनिल बोरूडे, बाबासाहेब वाकळे, रविंद्र बारस्कर, पल्लवीताई जाधव, मयूर ताठे आर्दीनी उपस्थिती लावून कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण सोहळा भक्ती, श्रध्दा आणि एकात्मतेचे प्रतीक ठरला. नामदेव शिंपी समाज ट्रस्टने अत्यंत सुरळीत नियोजन करून हा सोहळा यशस्वीपणे पार पाडला. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन राजेंद्र बगाडे यांनी केले.



श्री संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा येथे श्री विशाल गणेश मंदिर देवस्थान व उत्सव समितीतर्फे शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. शोभायात्रेचा शुभारंभ महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते करण्यात आला.

# संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त माळीवाड्यात शोभायात्रा

नगर – श्री संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा येथे श्री विशाल गणेश मंदिर देवस्थान व उत्सव समितीच्या वतीने शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. याचा प्रारंभ माळीवाडा येथील शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिराचे महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते श्री संत सावता महाराज यांच्या रथातील तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून करण्यात आला.

कार्यक्रमास देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, उत्सव समितीचे प्रमुख छबू नाना जाधव, माजी महापौर भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे, संभाजी कदम, सुवर्णा जाधव, मंगलताई लोखंडे, पंडितराव खरपुडे, अशोकराव कानडे, दत्ता जाधव, विष्णुपंत म्हस्के, बजरंग भुतारे, ज्ञानेश्वर रासकर, दत्ता गाडळकर, संजय चाफे, माणिकराव विधाते, भाऊसाहेब पुंड, सुभाष राऊत, बाळासाहेब पुंड, चंद्रकांत ताठे, अनिल इवळे, ह. भ. प. जालिंदर महाराज निकम, विष्णू फुलसौंदर, जालिंदर बोरुडे आदी उपस्थित होते.

या यात्रेत महिलांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. अनेक महिलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून डोक्यावर कलश घेऊन सहभाग नोंदवला. तसेच आळंदी येथून आलेल्या बाल वारकऱ्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात भक्तिगीतांवर सादरीकरण करत संपूर्ण शोभायात्रेला अध्यात्मिक रंगत दिली.

माळीवाडा येथील श्री विशाल गणपती मंदिराचा रथही शोभायात्रेचे मुख्य आकर्षण ठरला. या रथामध्ये संत सावता महाराज यांचे तैलचित्र आकर्षक फुलांच्या सजावटीसह स्थापित करण्यात आले होते, ज्याचे उपस्थितांनी मोठ्या भक्तिभावाने दर्शन घेतले.

ही शोभायात्रा माळीवाडा वेशीपासून सुरू होऊन फुलसौंदर चौक, ब्राह्मण गल्ली, बारातोटी कारंजा, इवळे गल्ली, कौटीची तालीम चौक, ढोर गल्ली मार्ग पुन्हा माळीवाडा चौकात विसर्जित झाली. संपूर्ण मार्गावर नागरिकांनी रथावर पुष्पवृष्टी करत उत्सवाचे स्वागत केले.

# हाजी हसन शहा कादरी (दादा पीर) दर्ग्याच्या सदल उरूसनिमित्त भंडारा

नगर – शहरातील कोठी येथील विद्युत महावितरणच्या कार्यालय मागे हाजी हसन शहा कादरी (दादा पीर) दर्ग्याच्या सदल उरूस निमित्त तख्ती दरवाजा येथे सर्वधर्मीयांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या भंडाऱ्याचा शुभारंभ मन्सूर सय्यद यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फरान शेख, अझर शेख, जोहेब काझी, साबीर शेख, कासिम शेख आदी उपस्थित होते.

संदल उरुस निमित्त भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले असून शहरातून पारंपारिक वाद्यांसमवेत चादर मिरवणूक काढण्यात आली.

दर्गात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दर्शनासाठी सर्व धर्मिय भाविकांनी गर्दी केली होती. दर्ग्याच्या मजारवर चादर अर्पण करून शांती, सद्भावना व समृध्दीची प्रार्थना करण्यात आली.



कोठी येथील विद्युत महावितरणाच्या कार्यालय मागे हाजी हसन शहा कादरी (दादा पीर) दर्ग्याच्या सदल उरूस निमित्त तक्ति दरवाजा येथे सर्व धर्मीयांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.



महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे आयोजित परीक्षेत भाग्योदय विद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा आयोजित परीक्षेत भाग्योदय विद्यालयाचे यश

नगर – नगर तालुक्यातील भोयरे पठार येथील भाग्योदय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे आयोजित राष्ट्रभाषा बाल प्रबोधनी, राष्ट्रभाषा प्राथमिक, राष्ट्रभाषा प्रवेशिका व राष्ट्रभाषा सुबोध या परीक्षांमध्ये यश संपादन केले आहे. परीक्षेत शाळेचा १०० % निकाल लागला आहे. तर विद्यार्थ्यांनी विशेष योग्यता व प्रथम श्रेणीमध्ये येण्याचा मान पटकाविला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. राष्ट्रभाषा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक हबीब शेख यांनी मार्गदर्शन केले. त्यांना विद्यालयातील शिक्षक सतीश मुसळे यांनीही मदत केली. गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भानुदास कोतकर, संस्थेचे सचिव सचिन कोतकर आर्दीसह विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे आयोजित घेण्यात आलेल्या भाग्योदय विद्यालय, भोयरे पठारचा निकाल पुढीलप्रमाणे – इयत्ता पाचवी बालबोधिनी एकूण १८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी विशेष योग्यता श्रेणीमध्ये १० विद्यार्थी, प्रथम श्रेणीमध्ये ६ विद्यार्थी, द्वितीय व तृतीय श्रेणीत प्रत्येकी एक विद्यार्थी उत्तीर्ण झाले. इयत्ता सहावीसाठी राष्ट्रभाषा प्राथमिक परीक्षेसाठी एकूण २० विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १६ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये, तर द्वितीय व तृतीय श्रेणीत प्रत्येकी २ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

इयत्ता सातवी मधील १९ विद्यार्थी राष्ट्रभाषा प्रवेशिका परीक्षेसाठी बसले होते. हे सर्व १९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. तसेच इयत्ता आठवीच्या वर्गासाठी असलेल्या राष्ट्रभाषा सुबोध परीक्षेसाठी ३१ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ४ विद्यार्थी विशेष योग्यता श्रेणीमध्ये, २६ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये व १ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

# श्रावण मास

*२५ जुलैपासून श्रावण मासारंभ होत आहे. आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या ४ महिन्यांच्या काळात भगवान श्री विष्णू महासागरात शेषशय्येवर योगनिद्रा घेत असल्याने सृष्टीचा भार भगवान शिव शंकरांवर पडतो. त्यामुळे या दिवसांत शिव उपासनेला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. श्रावण मसाविषयी शास्त्रीय माहिती या लेखातून जाणून घेऊया.*

'भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या 'श्रीमद्भगवत्गीते'तील संवादात भगवान श्रीकृष्णाने सांगितले आहे, 'मासांमध्ये (महिन्यांमध्ये) मी 'मार्गशीर्ष' मास आहे. याचप्रमाणे शिव आणि सनतकुमार यांच्यामध्ये श्रावणमासाबद्दल पुढील आशयाचा संवाद झाल्याचे पुराणात म्हटले आहे. भोलेनाथ शिव म्हणतात

**द्वादशस्वपि मासेषु श्रावणो मेऽतिवल्लभः ।**
**श्रवणार्हं यन्माहात्म्यं तेनासौ श्रवणो मतः ।।**
**श्रवणर्क्षं पौर्णमास्यं ततोऽपि श्रावणः स्मृतः ।**
**यस्य श्रवणमात्रेण सिद्धिदः श्रावणोऽप्यतः ।।**

**अर्थ :** १२ मासांतील 'श्रावण मास' मला अतिप्रिय आहे. त्याचे माहात्म्य श्रवण करण्यास योग्य आहे. त्यामुळे त्याला 'श्रावण मास' असे म्हटले जाते. श्रावण या शब्दाची उत्पत्ती 'श्रवण' या शब्दातून झाली आहे. 'श्रवण' शब्दाचे २ अर्थ होतात. त्यांपैकी एक म्हणजे 'हिंदु पंचांगातील २२ वे नक्षत्र', असा आहे आणि दुसरा अर्थ 'श्रवण म्हणजे ऐकणे.' श्रावणात श्रवणभक्ती केल्याने सिद्धी प्राप्त होतात. त्यामुळेच हा मास अत्यंत पवित्र आणि शुभ मानला जातो.

हिंदु धर्मात पंचांगातील ५ अंगांपैकी 'नक्षत्र' या अंगाला अत्यंत महत्त्व आहे. त्यामुळे हिंदु कालगणनेनुसार १२ मासांची नावे ही त्या त्या मासाच्या पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्या नक्षत्रानुसार आहेत, उदा. चैत्र मासातील पौर्णिमेला चंद्र 'चित्रा' नक्षत्रात असतो; म्हणून त्या मासाचे नाव 'चैत्र' आहे. श्रावणातील पौर्णिमेला चंद्र 'श्रवण' नक्षत्रात असतो. त्यामुळे त्या मासाचे नाव 'श्रावण' आहे. पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्या नक्षत्राचे चैतन्य आणि ऊर्जा त्या संपूर्ण मासात अधिक प्रमाणात कार्यरत असते.

**शास्त्रानुरुक्तो बहुपुत्रमित्रः सत्पात्रभक्तिः विजितारिपक्षः ।**
**चेज्जन्मकाले श्रवणा हि यस्य प्रेमा पुराणश्रवणे प्रवीणः ।। – जातकाभरण**

**अर्थ :** श्रवण नक्षत्रावर जन्माला आलेला मनुष्य शास्त्रप्रेमी, अनेक मित्र असलेला, मुलाबाळांची आवड असणारा, विधायक कार्ये करणारा, शत्रूंवर विजय मिळवणारा, पुराणश्रवण आदींमध्ये रुची असलेला असतो.

हिंदु संस्कृतीचे निर्माते असणार्या ऋषिमुनींना याचे सर्व ज्ञान होते. त्यामुळेच त्यांनी आपल्यावर उत्तम आणि उदात्त संस्कार व्हावेत आणि आपल्याला आवश्यक ते धर्मज्ञान सहजपणे मिळावे, यांसाठी श्रावण मासात अधिकाधिक ग्रंथ, कथावाचन, पारायण, व्रतवैकल्ये, दानधर्म इत्यादी करण्याचे मार्गदर्शन केले आहे. त्यामुळेच वर्षभर मांसाहार करणारे लोक श्रावण मासात मांसाहार पूर्णतः वर्ज्य करतात. बहुतेक घरांत श्री सत्यनारायणाची पूजा अगत्याने केली जाते. श्रावणात प्रत्येक वारानुसार व्रते, विशेष पूजा, उपवास इत्यादी गोष्टी स्त्रिया तर करतातच; पण बहुतेक पुरुषसुद्धा दाढी न करणे, केस न कापणे, तसेच उपवास करणे, घरात श्रीगुरुचरित्र, श्रीनवनाथ माहात्म्य, शिवलीलामृत, शिवपुराण किंवा कुठल्याही धार्मिक ग्रंथांची पारायणे इत्यादी आचारांचे पालन करतातच. त्यामुळे 'ब्रह्मांडातील ग्रह, तारे आणि नक्षत्रे यांचे मानवी जीवन किंवा चराचर सृष्टी यांवर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होतातच', याचाच हा पुरावा आहे. तात्पर्य काय, तर हिंदु धर्मशास्त्रातील विज्ञान समजून घेतले पाहिजे. त्यामुळे आपल्या जीवनात जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर, ते ते घडवण्यासाठी कटिबद्ध असणार्या प्रत्येक व्यक्तीच्या मानसिकतेला या 'श्रवण' नक्षत्रामुळे आणि 'श्रावण' मासामुळे योग्य ते क्रियमाण वापरण्यासाठी भरपूर प्रमाणात बळ मिळते. (संदर्भ : सनातन डॉट ऑर्ग)

# गटारी नव्हे, तर 'दीप अमावास्या'

**गतहारी शब्दाचा अपभ्रंश म्हणून 'गटारी'**

श्रावण मासारंभाच्या आदल्या दिवशी म्हणजे आषाढ अमावास्येला अखेरचे मांसाहार आणि आणि दारू ढोसण्याची प्रथा गेल्या काही वर्षांपासून पडली आहे. काहींच्या मते या अमावास्येला 'गतहारी अमावास्या' म्हटले जाई म्हणून पुढे गतहारी शब्दाचा अपभ्रंश म्हणून 'गटारी' नाव प्रचलित झाले. गटारी या नावाला कोणताही शास्त्राधार नाही, त्यामुळे हा हिंदु धर्मातील सण किंवा उत्सव नाही, तर ती केवळ एक अनिष्ट प्रथा आहे. हिंदु धर्मात आषाढ अमावास्या ही 'दीप अमावास्या' म्हणून प्रचलित आहे. या दिवशी घरातील सर्व समया, निरांजने, दिवे स्वच्छ धुऊन पुसून सभोवती रांगोळी काढून पाटावर त्यांना आसनस्थ केले जाते. दिवे प्रज्वलित करून त्यांची मनोभावे पूजा केली जाते. त्यांना पक्वानांचा नेवैद्य दाखवला जातो. 'तमसो मा ज्योतीर्गमय' म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करण्याची महान शिकवण दीप आपल्याला देत असतो. दीपच नसता तर मानवाचे जीवन अंधकारमय झाले असते त्यामुळे दिव्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे. काळाच्या ओघाने आणि भारतीयांवरील पाश्चिमात्यांच्या प्रभावामुळे या सणावर भोगवादाचे सावट आले. परिणामी सध्याच्या ३ पिढ्यांपैकी अनेकांना या दिवसाचे खरे महत्व ज्ञात नाही. किमान नव्या पिढीला तरी आषाढ अमावास्या ही गटारी अमावास्या नसून दीप अमावस्या आहे, याविषयीची माहिती ती योग्यरीत्या साजरी करूनच देऊया.

# आज दीप अमावस्या काही लोक त्याला गटारी अमावस्या म्हणतात..

## फक्त शब्दांचे अपभ्रंश नव्हे तर... रूढी परंपरा आणि विचारांचे सुद्धा अपभ्रंश..गटारी नव्हे दिव्यांची अमावस्या...

आपले सहा ऋतूंचे सहा सोहळे, हे आपल्या शारीरिक मानसिक, दिनक्रमाशी अगदी वैज्ञानिक दृष्ट्या देखील संबंधित ठेवतात.. याचा आपण कधी विचारच करत नाही.. उलट पक्षी या सगळ्या आपल्या परंपरेच्या गोष्टी मानायच्या नाहीत, या सगळ्या अंधश्रद्धा आहेत असे समजून आपण स्वतःला बनावट आधुनिक समजतो.. चैत्र, वैशाख, जेष्ठ आणि आषाढ या चार महिन्यांमध्ये कडाक्याचं ऊन त्यानंतर आलेला अवकाळी पाऊस, धूळ, वादळ, वारा अशा वातावरणात अचानक झालेले बदल, सकाळी थंडी, दुपारी तीव्र ऊन, संध्याकाळी पाऊस, पुन्हा रात्री थंडी अशा तीव्र उतार चढावा मधून आपलं आरोग्य आणि शरीर जात असतं.. अशावेळी अनेक संसर्गजन्य आणि साथीच्या रोगांचाही प्रादुर्भाव सुरु होतो.. उत्साह कमी होतो, अंग जड भरून येते, आणि एकंदर थोडेसे जड आणि मंद वातावरण असते... परंतु आपलं शरीर हे एक महाकॉम्प्युटर आहे, प्रत्येक ऋतूमध्ये पुन्हा हळूहळू परिस्थितीशी जुळवायला सुरुवात होते.. आषाढामध्ये पावसाने मध्यान्ह जोर धरलेला असतो.. आणि उद्या लगेचच श्रावण महिन्याचं आगमन होणार असतं.. अनेक सणांचे आणि धार्मिक वातावरणाचे उत्साही वातावरण सुरू होणार असते... अशावेळी घराची थोडी साफसफाई.. मुख्य म्हणजे पूर्वीच्या काळी इलेक्ट्रीसिटी नव्हती, लाईट नव्हते.. रात्रीचं सगळं आयुष्य हे पारंपारिक घरगुती दिव्यांवरच आधारित होतं.. अशावेळी श्रावण महिन्यात येणाऱ्या उत्साही सणांच्या धार्मिक वातावरणाचं स्वागत करण्यासाठी घरातील कानाकोपऱ्यात ठेवलेल्या सर्व दिव्यांची साफसफाई त्यानिमित्ताने ही आषाढी दीप अमावस्या... म्हणजे आपल्या घराच्या बाजूच्या चारही दिशांच्या अंधकाराचा आणि दुर्लक्षित भागाचा आढावा घेणे, असाही या पाठीमागे वैज्ञानिक आधार होता..

काळाच्या ओघात फक्त शब्दांचे अपभ्रंश होतात, असं नाही, तर चालीरीती रूढी परंपरा आणि विचार यांचे देखील अपभ्रंश होतात.. दीप अमावस्या याचं नाव कदाचित एखाद्या खाताड पेताड व्यक्तीने गटारी अमावस्या असे ठेवले असेल, आणि पुढे सोयीसाठी समविचारी लोकांनी ते रूढ केले असेल..

दिव्यांची साफसफाई घराची साफसफाई घरांचे सगळे कानेकोपरे उजळून टाकणारा हा तेजस्वी सण... आणि गटार याचा काय संबंध? या दिवशी मुक्या प्राण्यांची हत्या करून झिंगत झिंगत त्या शिजवलेल्या प्राण्यांची हाडं आता पुढे महिनाभर खायला मिळणार नाहीत, म्हणून मनसोक्त चघळत राहणे याचा काय संबंध? अर्थात आपल्या लोकशाही देशात ज्याला जे हवं ते करण्याचं संपूर्ण स्वातंत्र्य आहे.. ज्याला आयुष्यात फक्त खाण्या पिण्यातच इंटरेस्ट आहे, तो कुठल्याही कारणास्तव.. खुशी या हो गम... खायेंगे पियेंगे.. रम दमा दम दम... करतोच.

सगळ्या चांगल्या गोष्टींना अंधश्रद्धा समजणारे बनावट आधुनिक इतर दिवशी सर्व वेळ रम रमा रमी मध्ये रमणारे मात्र फक्त श्रावणात ते प्रकार न केल्यामुळे फार मोठे पुण्य लाभतं... याला मात्र अंधश्रद्धा समजत नाहीत... हे किती हास्यास्पद आहे. या काही पाप पुण्यांच्या व्याख्या किंवा निकष नाहीत, पण स्वतःच्या सोयीनुसार ते ठरवणे मूर्ख पणाचेच असते, आयुष्याच्या वेगवेगळ्या वळणावर कळत न कळत तशा चुका सर्वांकडूनच झालेल्या असतात. अर्थात सर्वांची वैचारिक आणि बौद्धिक पातळी, मान्यता पात्रते नुसार वेगवेगळी असू शकते.

ह्या दिव्यांच्या अमावस्येला पूर्वीसारखे आता आपल्याकडे कंदील, पणत्या, टेंभे, लामण दिवे, ही साधनं नसतील कदाचित.. आता एक बटन दाबलं की सगळीकडे लख्ख प्रकाश पडतो.. एवढी तांत्रिक आधुनिकता निश्चित आलेली आहे.. पण या दीप अमावस्ये निमित्त जात, धर्म, पंथ भाषा, याच्या पलीकडे प्रकाशात जाऊन एका चांगल्या विचाराचे बटन दाबले.. तर मला वाटते आपल्या मेंदूत देखील आपण फक्त एक माणूस असल्याचा लख्ख प्रकाश पडायला काही हरकत नाही.. आणि ते बटन दाबल्यानंतर आयुष्यभर सतत दुसऱ्यावर जळत राहण्यापेक्षा, सगळ्या बाबतीत उधार उसनवारीवर जगत राहण्यापेक्षा, आपण आतल्या आत दिव्याप्रमाणे जळून... दुसऱ्यांसाठी जमत नसेल तर निदान स्वतःच्या आयुष्यापुरता जरी प्रकाश केला, तरी ठिक आहे..

आजकालचं वातावरण माणुसकीच्या सर्व बाबतीत अंधारमय झालेलं आहे.. अशावेळी गीते मधल्या श्रीकृष्णाने दिलेल्या वचनाच्या ओळी आठवतात .. यदा यदाही धर्मस्य.. ग्लानिर्भवती भारत.. अभ्युथानम अधर्मस्य संभवामी युगे युगे.. अधर्माच राज्य माजले तर मी जन्म घेईल.. असं श्रीकृष्ण म्हणाला.. मग अंधाराचे एवढं साम्राज्य पसरलेलं असताना तू कधी जन्म घेणार आहेस..

हुआ है बहुत अंधियारा, अब सुरज निकलना चाहिए..
जिस तरह से भी हो, ये मौसम बदलना चाहिए..
रोज जो चेहरे बदलते है लिबासो की तरह..
जनाजा अब जोर से उनका निकलना चाहिए..
फुल बनकर जो जिया, वो यहां मसला गया..
जिस्त को अब फौलाद के साचे मे, ढलना चाहिए..
छिनता है अब तुम्हारा कोई हक, इस वक्त तो..
आंख से तुम्हारे आंसू नही...शोला निकलना चाहिए..
हुआ है बहुत अंधियारा, अब तो सूरज निकलना चाहिए !

दीपअमावस्येच्या सर्वांना तेजाच्या तेजस्वी हार्दिक शुभेच्छा !

**– सुहासभाई मुळे ९००२६६८५५५**

# इतिहास केवळ भूतकाळ नसुन तो वर्तमानात शिकवण देऊन भविष्य घडवितो

## डॉ.कमर सुरुर यांचे प्रतिपादन; पंकज मेहेर यांच्या जुन्या वस्तूंच्या संग्रहालयास मुंबईतील इतिहासप्रेमींची सदिच्छा भेट



पंकज मेहेर यांच्या जुन्या वस्तूंच्या संग्रहालयास मुंबईतील इतिहास प्रेमींची सदिच्छा भेट दिली.

नगर – पंकज मेहेर यांचे संग्रहालय म्हणजे केवळ वस्तूंचं ठिकाण नाही, तर आपल्या संस्कृतीचा आणि इतिहासाचा जिवंत दस्तऐवज आहे. ते ज्या प्रकारे इतिहासाला जपण्याचा प्रयत्न करत आहेत, तो आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. इतिहास हा केवळ भूतकाळ नसतो, तो वर्तमानात शिकवण देतो आणि भविष्य घडवितो, असे प्रतिपादन मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीच्या सचिव कवयित्री डॉ. कमर सुरूर यांनी केले.

मुंबई येथून इतिहास प्रेमी नगर येथे आले असता त्यांनी इतिहास प्रेमी व ऐतिहासिक वस्तू संग्राह पंकज मेहेर यांच्या वस्तू संग्रहालयास भेट दिली. यावेळी मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीच्या सचिव कवयित्री डॉ. कमर सुरूर, डॉ.शमा फारुकी, संग्राहलयाचे संचालक पंकज मेहेर, ठाकूरदास परदेसी, अकीला बाजी आदी उपस्थित होते.

मुंबई येथून आलेल्या अकीला बाजी व त्यांच्या सर्व टीमने पंकज मेहेर यांच्या संग्रहालयातील निजामकालीन, शिवकालीन, ब्रिटिशकालीन अनेक वस्तू तसेच जुने नाणी चलनी नोटा, वृत्तपत्रे, घड्याळ, टेलिफोन, पोस्ट तिकिट, पाकीट, पुस्तके, भांडी अश्या अनेक दुर्मिळ वस्तू बघितल्या व त्यांच्या संग्रहित केलेल्या सर्व गोष्टींचे भरभरून कौतुक केले.

पुढे बोलताना डॉ. कमर सुरूर म्हणाल्या की, मुंबईहून येऊन पंकज मेहेर यांच्या ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाला भेट देणे ही आमच्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे. आपल्या या भेटीमुळे केवळ संग्रहालयाचेच नव्हे, तर संपूर्ण शहराचे गौरव वाढले आहे. पंकज मेहेर यांनी गेल्या अनेक वर्षांत अत्यंत मेहनत, चिकाटी आणि निस्वार्थ भावनेने ही दुर्मिळ वस्तूंची संपत्ती संकलित केली आहे, असे नमुद केले.

यावेळी डॉ.शमा फारुकी म्हणाल्या की, पंकज मेहेर यांनी आपल्या अथक मेहनतीने आणि अभ्यासातून अनेक वर्षांपासून या वस्तूंचा संग्रह केला आहे. व अशा संग्रहालयांच्या माध्यमातूनच पुढच्या पिढ्यांना इतिहासाची जाणीव होईल, असे मत व्यक्त केले.

सर्वांचा पंकज मेहेर यांनी पुस्तके व चांदबीबी महालाची प्रतिकृती भेट देऊन सन्मान केला.



भारतीय जनता पक्षाच्या सावेडी मंडळाच्या व्यापारी आघाडीच्या अध्यक्षपदी उद्योजक हेमंत पवार यांची नियुक्ती शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या हस्ते पत्र देऊन करण्यात आली.

# सावेडी भाजप व्यापारी आघाडी अध्यक्षपदी हेमंत पवार यांची नियुक्ती



नगर – भारतीय जनता पक्षाच्या सावेडी मंडळाच्या व्यापारी आघाडीच्या अध्यक्षपदी उद्योजक हेमंत पवार यांची निवड करण्यात आली आहे. ही नियुक्ती भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या हस्ते पत्र देऊन करण्यात आली. सावेडी मंडळ अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर काळे यांच्या सहीने अधिकृत पत्र देण्यात आले. या वेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, नरेंद्र कुलकर्णी, अशोकराव गायकवाड पस्थित होते.

हेमंत पवार हे अहिल्यानगर परिसरात हॉटेल, मर्चंट व कापड व्यवसायात कार्यरत असून, व्यवसाय सांभाळून त्यांनी अनेक सामाजिक उपक्रमही राबवले आहेत. गरजूंसाठी अन्नछत्र, शैक्षणिक मदत, आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे अशा विविध उपक्रमांमधून त्यांनी आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे.



जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत महावीर मल्लखांब व योगा ट्रेनिंग सेंटरचा विजयी संघ.

# जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत महावीर मल्लखांब व योगा ट्रेनिंग सेंटरला द्वितीय जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी

## १२ सुवर्णासह २६ पदकांची कमाई, १२ खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

नगर – संगमनेर येथे नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत नगर मधील श्री रामावतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर मल्लखांब आणि योगा ट्रेनिंग सेंटरच्या खेळाडूंनी १२ सुवर्ण, ११ रोप्य, ३ कास्य असे एकूण २६ पदके मिळवून द्वितीय क्रमांकाची जनरल चॅम्पियनशिपची ट्रॉफी मिळवली. या स्पर्धेमधून क्लबच्या १२ खेळाडूंची राज्यस्तरीय योगासन स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्हा संघात निवड झाली आहे.

या कामगिरीबद्दल ट्रस्टचे विश्वस्त मोहनलाल मानधना यांनी खेळाडूंचे कौतुक केले.

प्रतिक्रिया देताना मानधना म्हणाले, शालेय विद्यार्थ्यांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी, योगासन सारख्या खेळामुळे मुलांची शारीरिक तसेच मानसिक वाढ व्हावी तसेच मुलांनी किमान एक तास तरी आरोग्यासाठी द्यावे या हेतूने क्लब मार्फत शेकडो शालेय मुला-मुलींना योगासन मल्लखांब, रोप मल्लखांब आणि एरियल सिल्कचे प्रशिक्षण देण्याचे कार्य अविरत गेल्या २० वर्षापासून केले जात आहे. विविध स्पर्धांमध्ये क्लबचे खेळाडू उत्कृष्ट कामगिरी करतात. योगासन, मल्लखांब या खेळाच्या प्रचार प्रसारात क्लबने मोठे योगदान देत आहे. गुणी खेळाडूंना नेहमीच पाठबळ आणि प्रोत्साहन दिले जाईल.

या ट्रेनिंग सेंटर मध्ये राष्ट्रीय प्रशिक्षक उमेश झोटिंग, प्रणिता तरोटे, आप्पा लाडाने, अक्षय पावडे यांचे मार्फत मुलांना प्रशिक्षण दिले जाते. विजेत्या सर्व खेळाडूंचा ट्रस्ट मार्फत सन्मान करण्यात आला.

# मार्केटयार्ड चौकातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धाकृती पुतळा महानगरपालिका आयुक्तांकडे केला सुपूर्त



मार्केटयार्ड चौकातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा महानगरपालिका आयुक्तांकडे सुपूर्त करण्यात आला.

नगर – विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण सोहळा येण्याऱ्या २७ जुलैला होणार आहे. त्यापूर्वी मार्केटयार्ड चौकातील अर्धकृती पुतळा हा सन्मानाने बौद्ध धम्माच्या परंपरेनुसार विधिवत पूजा करून काढण्यात आला व तो अर्धाकृती पुतळा महापालिकेच्या आवारात बसवण्यात येणार असून अर्धाकृती पुतळा हा मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्या कडे सुपूर्त करण्यात आला.

या अर्धाकृती पुतळ्याची मार्केट यार्ड चौकामध्ये स्थापना १० नोव्हेंबर १९६१ रोजी तत्कालीन समाज कल्याण मंत्री दादासाहेब रूपवते यांच्या हस्ते करण्यात आले होते व आज रूपवते यांचा स्मृतीदिनी हा पुतळा काढण्यात आला.

यावेळी सुरेश बनसोडे, मनपा अभियंता परिमल निकम, सुमेध गायकवाड, सुनील शेत्रे, अशोक गायकवाड, अजय साळवे, सुनील शिंदे, विजयराव भांबळ, किरण दाभाडे, संजय जगताप, नाथा अल्हाट, विशाल कांबळे, अमित काळे, दीपक अमृत, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, नितीन कसबेकर, रोहित आव्हाड, योगेश साठे, सुजित घंगाळे, सागर ठोकळ, समीर भिंगारदिवे, गौतमी भिंगारदिवे, अण्णासाहेब गायकवाड, दया गजभिये, अंकुश मोहिते, निखिल सूर्यवंशी, शैनेश्वर पवार, जीवन कांबळे, पोपट जाधव, डी आर जाधव, एल बी जाधव, लखन सरोदे, बंटी शिरसाट, सुजन भिंगारदिवे, नगरसेवक राहुल कांबळे, सागर विधाटे, ऋषी विधाटे, ओम भिंगारदिवे, विलास साठे, सचिन शेलार, सिद्धांत कांबळे, सिद्धांत गायकवाड, शांत्वन साळवे, महेश भोसले, दीपक पाटोळे, रवींद्र कांबळे, येसुदास वाघमारे, बाबा कदम, नितीन खंडारे, नवीन भिंगारदिवे, हरीश आल्हात आदी उपस्थित होते.



पूर्णाकृती पुतळा समितीच्या वतीने पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना निमंत्रण पत्रिका देताना समितीचे पदाधिकारी.

# पूर्णाकृती पुतळा समितीच्यावतीने पालकमंत्र्यांना निमंत्रण पत्रिका

नगर – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णा कृती पुतळ्याच्या अनावरण सोहळ्याच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी म्हणून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना कार्यक्रमाची पत्रिका देताना समितीचे सुरेश बनसोडे, सुमेध गायकवाड, अजय साळवे, सुनील शेत्रे, नितीन कसबेकर, संजय जगताप, विलास साठे, विजय भांबळ अंकुश मोहिते आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

शहरात २७ जुलै रोजी पुतळा लोकार्पण सोहळ्याचा कार्यक्रम या मुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आयोजित केले असून आमदार संग्राम जगताप हे स्वागतध्यक्ष राहणार असून यानिमित्ताने कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वीकारावे अशी मागणी समितीच्या वतीने करण्यात आली असून निमंत्रण पत्रिका देण्यात आली.

